या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक

# लोकआरंभ

लोकक्रांतीचा आरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार १ ऑगस्ट २०२४ | अंक२३५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



# प्रा.कुडके यांनी विद्यार्थी घडवण्याबरोबरच उभेही केले सेवापुर्ती सोहळ्यात शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक मंथन

**बीड । वार्ताहर**

शहिद भगतसिंग विद्यालयातील प्राध्यापक शिवमुर्ती कुडके यांनी आपल्या 29 वर्षाच्या कार्यकाळामध्ये विद्यालयात केवळ विद्यार्थीच घडवले नाही तर अनेक गोरगरिब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करत उभे करण्याचे कामही केले. शिक्षक असतांनाही समाजभान ठेवून समाजामध्ये विविध उपक्रम राबवत त्यांनी शेतीसारखा प्रयोग यशस्वी करत बालाघाटच्या डोंगरात आगळावेगळा प्रयोगही यशस्वी केला. त्यामुळे निवृत्तीनंतरही त्यांना सातत्याने सक्रिय राहून समाजसेवा करण्याचे व्रत स्विकारावे लागेल. त्यांच्यासारखा शिक्षक संस्थेला पुन्हा मिळणार नाही असे गौरवोद्गगार संस्थेच्या अध्यक्षा प्रा.सुशिला मोराळे यांनी काढले. शिवमुर्ती कुडके यांच्या एकंदरीत कार्यकाळाविषयी आणि शिक्षक सेवेविषयी आ.विक्रम काळे, माजीमंत्री सुरेश नवले, माजी आ.राजेंद्र जगताप, भाशिप्रचे प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह आदी मान्यवरांनी कौतूक करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रा.सुशिला मोराळे यांनी आपल्या भाषणामध्ये शिवमुर्ती कुडके यांना मी बोलावून घेत नौकरी दिल्याचे सांगत असतांनाच अत्यंत हुशार आणि क्रियाशील चळवळीचा कार्यकर्ता म्हणून मी शिवमुर्तीला ओळखत होते. त्याचे राजकीय विचार काय आहेत. याकडे मी पाहिले नाही. केवळ त्याचा सांघीक आणि क्रियाशीलता



हा गुण विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आहे यामुळेच त्याला संस्थेवर घेतले. त्यांनी देखील आपल्या सेवाकार्यकाळामध्ये संस्थेची प्रामाणिक सेवा केली. अनेक विद्यार्थी घडवले. त्यामुळे संस्थेलाही नावलौकीक मिळण्यास मदत झाली असे त्या म्हणाल्या. शिवमुर्ती कुडके यांच्याविषयी बोलतांना आ.विक्रम काळे यांनी कुडके यांची एक विनिंग आता यशस्वीरित्या संपली आहे. खऱ्या अर्थाने आता ते समाजसेवेमध्ये सक्रिय राहून काही तरी चांगले काम उभा करतील. शेतीमध्ये त्यांचे वेगवेगळे प्रयोग चालूच आहेत. त्यामुळे शेती आणखी बहरेल असा विश्वास व्यक्त केला. प्रा.सुरेश नवले यांनी कुडके यांच्याविषयी ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी शिक्षण घेवून परिपुर्ण कसा होईल यासाठी त्यांनी केलेले प्रयोग नक्कीच महत्वाचे आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षक हा कधीही संपत नाही. बाकी क्षेत्रात लोक विसरतात पण शिक्षकांना लोक विसरत नाहीत. कुडके यांनी चांगली पिढी घडणवण्याचे पवित्र्य कार्य केल्याचे सांगितले. माजी आ.राजेंद्र जगताप यांनी देखील थेट त्यांच्या कुटुंबाद्दलच माहिती देत कुडकेंचे घरच क्रियाशील आहेत. त्यांच्या वडिलांविषयी बोलतांना त्यांनी ते एक चांगले कुस्तीपटू होते. प्रा. शिवमुर्ती कुडके यांनी आपली नौकरी सांभाळून घर आणि शेतीही सांभाळली. समाधानी कुटूंब म्हणून त्यांनी आपला संसार उभा केला. त्यातच त्यांचे मोठे यश असल्याचे जगताप यांनी सांगितले. या कार्यक्रमातच या सर्व वक्त्यांनी विद्यमान शिक्षण परिस्थिती, शिक्षकांची आवस्था, विद्यार्थ्यांची परिस्थिती आणि सामाजिक परिस्थिती याबद्दल विश्लेषात्मक आपली मते मांडली. त्यातून एक चांगले मंथनही झाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सौ.खोसे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. गाडेकर यांनी केले. कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील मान्यवर,मुख्याध्यापक, पत्रकार, कुडके यांचे कुटुंबिय, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे...नारायण गडावर मिळणार सावलीसह फळे: नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, विश्वस्त बळीराम गवतेंच्या हस्ते १०० चिंचाची लागवड

**(बीड-प्रतिनिधी)-**

बीड: धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाला मोठी परिसर असून याठिकाणी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...' हा ध्यास घेवून वृक्षारोपणाचे कार्य मागील काही वर्षांपासून सुरू आहे. याठिकाणी सावलीसही फळे देणाऱ्या वृक्षांना प्राधान्य दिले जात असून आजवर आंबा, नारळ, जांभळ, सिताफळची लागवड केलेली आहे तर दि.३१ जुलै १०० चिंचाच्या रोपांचे रोपण गडाचे महंत शिवाजी महाराज आणि विश्वस्त बळीराम गवते यांच्या हस्ते करण्यात आले. श्री.क्षेत्र नगद नारायण गडावर संस्थांनची शेकडो हेक्टर जमीन आहे. गड डोंगरावर असल्याने त्याठिकाणी पुर्वीपासून खुरटी झाडे आहेत. यामुळे गडावर येणाऱ्या भाविकांना सावली मिळत नाही. याचीच दखल घेत मागिल काही वर्षांपासून महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गडावर येणाऱ्या चारही रस्त्यांच्या बाजुने वृक्षारोपण करण्यात येत आहे. सुरूवातीच्या काळात वडाची झाडे लावण्यात आलेली असून आता ती मोठी झालेली आहे. परंतु वडापासून सावली मिळते, परंतु गडावर येणाऱ्या भक्तांना प्रसादरूपी फळे मिळावेत, यासाठी जवळपास पाच एकरात आंबा लावण्यात आलेला आहे तर पाच एकरात सिताफळ लावली आहे. शिवाय जिथे यात्रा भरते त्या परिसरात जांभळ लावण्यात आलेली आहे. आता रस्त्यांच्या कडेने चिंच लागवड करण्यात येत आहे. दि.३१ जुलै रोजी कोळगाव (ह) ता.बीड येथील संतकृपा नर्सरीने गडासाठी सात फुट उंचीच्या १०० चिंचाची रोपे गडावर पाठवली. नर्सरीचे मालक गंगाराम महाराज यांनी ही सेवा केली असून महंत शिवाजी महाराज, विश्वस्त बळीराम गवते यांच्या हस्ते या चिंचाचे रोपण करण्यात आले यावेळी नवनाथ काशिद, पंकज कारंडे, जालिंदर शिंदे. व भक्त गण.



भक्तांकडून लोखंडी जाळ्या श्री.क्षेत्र नगद नारायण गडावर हिरवळ व्हावी, या गडावर येणाऱ्या भक्तांना सावली मिळावी, यासाठी मागील तीन वर्षापुर्वी भाविकांनी लावलेली झाडे जनावरांपासून वाचावेत, यासाठी लोखंडी जाळ्या दिल्या होत्या. सदरील जाळ्या जिल्हाधिकारी, स्व.विनायक मेटे यांच्या हस्ते झाडांना लावण्यात आल्या होत्या. धाकटी पंढरी श्री.नगद नारायण गड येथील डोंगरावर सामाजिक भान ठेवून भक्तांच्या सहकार्यातून भविष्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. त्यासाठी तयारी सुरू असून येणाऱ्या काळात येथील ओसाड माळरानावर सर्वत्र हिरवळ दिसेल, असा विश्वास आहे. त्यासाठी सर्वांना सोबत घेवून काम करू.

-बळीराम गवते, विश्वस्त, नारायणगड.

## मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतीगृहात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांने अर्ज करण्याचे आवाहन

बीड, दि. 31 :- मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतीगृह, (चांदमारी) बी अॅन्ड सी कॉर्टर, धानोरा रोड बीड या वसतीगृहात सन 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी दि. 26 जुलै ते 14 ऑगस्ट 2024 या कालावधीमध्ये शासकीय सुटया वगळता विहीत नमुन्यातील अर्ज अंतीम तारखेच्या आत योग्य कागदपत्रासह परिपूर्ण भरुन कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या वसतीगृहात माध्यमिक विभाग , उच्च माध्यमिक विभाग, महाविद्यालय विभाग विद्यार्थ्यांसाठी आहे. मागील वर्षात वसतीगृहात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांनी पुर्न प्रवेशासाठी शेकडा 60 टक्के गुण असणे आवश्यक आहे. आशा विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतीगृहाचे गृहप्रमुख यांनी केले आहे.

त्रुटी असलेले अपूर्ण अर्ज व अंतीम तारखेनंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

## महसूल दिनानिमित्त महसूल पंधरवडा १ ऑगस्टपासून

**बीड :- (प्रतिनीधी )**

बीड, दि.31 : महसूल विभागातर्फे दरवर्षी 1 ऑगस्ट हा 'महसूल दिन' म्हणून साजरा करण्यात येतो यावर्षी एक ऑगस्ट पासून ते 15 ऑगस्ट पर्यंत महसूल पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे यापूर्वी महसूल सप्ताह साजरा होणार होता यात वाढ करून आता सप्ताह ऐवजी पंधरवडा साजरा होणार आहे.

गुरुवारी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल दिन साजरा होऊन महसूल पंधरवड्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात होईल.

या निमित्ताने राज्य शासनाच्या विविध महत्वकांक्षी योजनांची माहिती नागरिकांमध्ये जनजागृती आणि नागरिकांचे काही प्रश्न असल्यास त्याचा निपटारा करण्यात येणार आहे. या अंतर्गत 01 ऑगस्ट रोजी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना" 2 ऑगस्ट रोजी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण" योजना 3 ऑगस्ट रोजी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन" योजना 4 ऑगस्ट रोजी "स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय" 5 ऑगस्ट रोजी "कृषी मार्गदर्शन" कार्यक्रम 6 ऑगस्ट रोजी "शेती पाऊस आणि दाखले" 7 ऑगस्ट रोजी "युवा संवाद" 8 ऑगस्ट रोजी "महसूल- जनसंवाद" 9 ऑगस्ट रोजी 'महसुली ई – प्रणाली' 10 ऑगस्ट रोजी "सैनिक हो तुमच्यासाठी" 11 ऑगस्ट रोजी "आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन" 12 ऑगस्ट रोजी "एक हात मदतीचा - दिव्यांगाच्या कल्याणाचा" 13 ऑगस्ट रोजी "महसूल अधिकारी कर्मचारी यांची प्रशिक्षण" 14 ऑगस्ट रोजी "महसूल पंधरवडा वार्तालाप" आणि दिनांक 15 ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद तसेच उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवडा सांगता समारंभ असा कार्यक्रम होऊन या महसूल पंधरवड्याचा समापन होणार आहे. 0000

## मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त आज पाटोद्यात रक्तदान शिबिर

पाटोदा । मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी पाटोदा शहरात सकल मराठा समाज पाटोदा यांच्या वतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या रक्तदान शिबिरात शेकडो कार्यकर्ते रक्तदान करणार असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागात देखील अनेक गावांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये ३ ते ४ दिवसांपासून शेकडो युवकांनी रक्तदानासाठी नोंदणी केली आहे. १४० च्या वर युवक या शिबिरात रक्तदान करणार आहेत. शिबिराचा शुभारंभ विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे सतीश महाराज उरणकर यांच्या हस्ते होणार आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्करसमवेत सामंजस्य करार

### राज्यातील मोटार निर्मिती उद्योगात क्रांती आणणारा प्रकल्प - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### मराठवाड्यात २० हजार कोटींची गुंतवणूक होणार

**मुंबई(प्रतिनिधी)**

मुंबई, दि. ३१ : छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच शिवाय एकूणच भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगात देखील एक क्रांती येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

आज सह्याद्री अतिथिगृह येथे राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते .

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, किर्लोस्कर मोटर्सच्या उपाध्यक्ष मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, टाटा किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक मसाकाझू योशीमुरा, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे. एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कारचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कारची निर्मिती होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे.

ई-क्रांती येणार





टोयोटाच्या या प्रकल्पामुळे भारताच्या ई-कार्स निर्मिती उद्योगात क्रांती येईल, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य शासन देखील इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असून सार्वजनिक वाहतूक यंत्रणेत देखील वाहनांचा वापर वाढवला आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग केंद्र उभारण्यासाठी कायाद्यात आवश्यक ते बदल केले आहेत. राज्यात सर्वोत्तम दळणवळण, कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि जागा उपलब्ध आहे. टोयोटाचे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि आमचे कुशल मनुष्यबळ याची चांगली सांगड होईल. राज्यात शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, गृहनिर्माण अशा सुविधा मुबलक उपलब्ध असून कोणत्याही उद्योगाच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आनंदाने राहता येईल, असे वातावरण आहे. राज्य विदेशी गुंतवणुकीत अग्रेसर असून गेल्या दोन वर्षात दावोस येथे झालेल्या ६० दशलक्ष डॉलर्सच्या करारांची ८० टक्के अंमलबजावणी झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

आपल्या भाषणाची सुरुवात मुख्यमंत्री श्री.शिंदे यानी जपानी भाषेत नमस्कार म्हणजे "कोनीचिवा" असे संबोधून केली, तर आभार देखील "एरिगेटो गोझामासू" अशा शब्दात मानले.

टोयोटा आल्याने अपूर्णता संपली - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यावेळी या कराराचे वर्णन 'ऐतिहासिक' या शब्दात करून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात अनेक ऑटोमोबाईल सेक्टर आहेत पण टोयोटा नसल्याने ते अपूर्ण होते. आता राज्यात टोयोटा असल्याने हे सेक्टर पूर्ण झाले आहे. मराठवाड्यातील चेंबर ऑफ कॉमर्स समूह या उद्योगासाठी शासनाच्या वतीने सर्वोतोपरी सहकार्य करेल. या गुंतवणुकीमुळे मराठवाड्यात रोजगार निर्मिती तर होणारच आहे पण आर्थिक प्रगतीही साध्य होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याकडे वाटचाल सुरु केली आहे. हा करार अर्थव्यवस्था वाढीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यात जेएनपीटीसारखे बंदर आहे आणि त्याच्या तीनपट मोठे वाढवणं बंदर होणार आहे. हे देशातील सर्वात मोठे बंदर ठरणार आहे. तसेच जालनामध्ये ड्राय पोर्ट होणार आहे. निर्यातीसाठी उत्तम असल्याने मराठवाड्यात गुंतवणूक म्हणजे निर्यातीच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मसाकाझु योशीमुरा यांनी देखील आपल्या मनोगतात महाराष्ट्राची निवड या प्रकल्पासाठी करण्यामागची करणे सांगितली. भारत आणि महाराष्ट्राच्या समग्र विकासात टोयोटा देखील एक भागीदार बनू इच्छिते. देशाशी गेल्या अडीच दशकापासून आमचे संबंध असून ते या प्रकल्पाच्या अजून वाढीस लागतील असेही म्हणाले. मानसी टाटा यांनी देखील यावेळी राज्य शासनाचे या प्रकल्पासाठी सहकार्य मिळाल्याबद्धल आभार मानले. प्रारंभी प्रधान सचिव डॉ. कांबळे यांनी या प्रक्ल्पामागची भूमिका स्पष्ट केली. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनी सूत्रसंचालन केले.

# जिल्ह्यात १० ऑगस्ट रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश

बीड, दि. 31 :- मराठा ओबीसी,धनगर व इतर समाजाचे विविध उपोषण,आंदोलने,सभा सद्या सुरु असून जिल्हयात राजकीय हालचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने, रास्ता रोको या सारखे आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेची शक्यता नाकारता येत नाही.तसेच आगामी कालावधीत मराठा,ओबीसी, धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहेत. कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. हा मनाई आदेश 10 ऑगस्ट 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# कर्जत जामखेड मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे विधानसभेचे उमेदवार व भावी आमदार रोहितदादा पवार हेच राहणार मविजयसिंह गोलेकर यांचा निर्वाळा

**खर्डा ( प्रतिनिधी )**प्रा. महेश बजगुडे गेल्या कित्येक वर्षांपासूनचा भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या कर्जत जामखेड मतदारसंघात जबरदस्त परिवर्तन घडवत आ.रोहितदादा पवार निवडून आले व त्यांनी या मतदारसंघाला राज्यात नव्हे तर देशात वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे. त्यामुळे या मतदारसंघात आ.रोहितदादा पवार हेच विधानसभेचे उमेदवार असतील यात शंका घेण्याचे कोणतेच कारण नसल्याचा निर्वाळा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे जामखेड तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी दिला. कर्जत येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत विधानसभेसाठी ॲड.कैलास शेवाळे यांच्या उमेदवारीची मागणी केली या पार्श्वभूमीवर श्री. गोलेकर यांनी ही माहिती दिली.



आ.रोहितदादा पवार हे महाविकास आघाडीचे प्रमुख नेते असून त्यांच्या वर आघाडीच्या अनेक नेत्यांच्या प्रचाराची जबाबदारी असणार आहे. पुढचे सरकार महाविकास आघाडीचेच राहणार असल्याची खात्री प्रत्येक कार्यकर्त्याला असून त्यामध्ये महत्वाचे मंत्री पद आ.रोहितदादा पवार यांना मिळणार असताना उमेदवार बदलीची चर्चा निष्फळ ठरणार असल्याचेही श्री.गोलेकर यांनी सांगितले. गेल्या निवडणुकीत आ.रोहितदादा पवार हे 'जायंट किलर' ठरले. त्यांनी कर्जत जामखेड सारख्या आव्हानात्मक मतदारसंघाची निवड करत तत्कालीन कॅबिनेट मंत्र्यांचा दारुण पराभव केला. त्यानंतर या मतदारसंघात त्यांनी विकासकामांचा धडाका लावला. अनेक वर्षांपासूनचे प्रश्न निकाली काढले. सरकार गेल्यानंतर संघर्षाची भूमिका घेत, ईडी किंवा इतर दबावतंत्रांपुढे न झुकता लढाऊ वृत्ती दाखवत स्वाभिमानी बाणा जपला. ही संघर्षाची प्रेरणा माझ्या मतदारसंघातील जनतेकडून मिळाल्याची मोठेपणाने जाहीर कबुली दिली. पक्ष फुटल्यानंतर स्वतः च्या राजकीय फायद्यासाठी निष्ठा न बदलता आजोबा शरदचंद्र पवार यांच्या बरोबर राहण्याचा निर्णय घेतला. मतदारसंघातीलच नव्हे तर राज्यातील, देशातील युवा, विद्यार्थी, शेतकरी, महिला, उपेक्षित यांच्या साठी कायम केंद्र सरकार तसेच राज्य सरकारमधील मंत्री,नेत्यांना अंगावर घेतले. राज्यात संघर्ष यात्रा काढत सरकारच्या चूकीच्या धोरणांना वेळोवेळी विरोध केला. पहिल्या टर्म मधील एखादा लोकप्रतिनिधी किती चांगले काम करु शकतो, सरकारला धारेवर धरु शकतो याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणून आ.रोहितदादा पवार हे अख्खा देशात ओळखले जातात. असा लोकप्रतिनिधी, नेता एखाद्या मतदारसंघाला लाभणे व सर्वसामान्य जनतेनेही तेवढ्याच उत्कटतेने त्याच्यावर प्रेम करणे हे फक्त आ.रोहित पवार यांच्या बाबतच होऊ शकते असेही श्री.गोलेकर म्हणाले. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची काही नाराजी असल्यास ती चर्चेने दूर होईल अशी खात्री असल्याचेही श्री.गोलेकर यांनी सांगितले.

## आम आदमी पार्टीचे माजी सैनिक अशोक येडे बीड विधानसभेच्या उमेदवारांची घोषणा



बीड महाराष्ट्रातील येणाऱ्या 288 विधानसभा आम आदमी पार्टी स्वबळावर लढणार आहे यानिमित्त 31 जुलै 2024 रोजी महाराष्ट्राचे संघटन मंत्री माननीय संग्राम घाडगे पाटील हे आले असता बीड जिल्ह्यातील सहा चे सहा विधानसभेची चाचपणी बैठक घेऊन येथील कार्यकर्त्यांच्या भावना व पार्टीचे काम पाहता बीड विधानसभेची उमेदवारी माजी सैनिक अशोक येडे जिल्हा अध्यक्ष आम आदमी पार्टी बीड यांचे नाव सर्व सहमतीने जाहीर करण्यात आले व बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना येणाऱ्या निवडणुका ह्या ताकतीने लढवल्या जातील सर्व ताकतीने कामाला लागा असे आव्हान माननीय संग्राम घाडगे पाटील यांनी केले आहे यावेळी जिल्ह्यांतील सर्व कार्यकर्ते जिल्हा कमिटीतील माजी सैनिक अशोक येडे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव खंडागळे, जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष बबन ढाकणे, जिल्हा संघटन मंत्री प्राध्यापक ज्ञानेश्वर राऊत, जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष बीड भीमराव कुठे, शिरूर तालुकाध्यक्ष आसमान जी जरांगे पाटील, शहराध्यक्ष शिरूर कासार विष्णुपंत गिरी, परळी तालुकाध्यक्ष व्यंकट जी मुंडे, विजय जोशी, राजेसहेब देशमुख परळी शहराध्यक्ष, विकास मुंडे, अंकुश हलगे, राहुल पाचेगवकर, संजय सपानकर, तालुकाध्यक्ष केज नाशेरजी मुंडे, आंबेजोगाई तालुका अध्यक्ष रामकृष्ण गुंडरे, कृष्णा जगताप किसान आघाडी, रफिक पठाण अल्पसंख्याक, अगाडी राजू भाई कामगार आघाडी, शहराध्यक्ष बीड सय्यद सादेक, रामभाऊ शेरकर विल्सन कांबळे शिवाजीराव वाघमारे प्रवीण आणि राव माऊली शिंदे मुकुंद शिंदे पंडित वाघमारे इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आष्टी येथील सिव्हिल हॉस्पिटल मधील भोंगळा कारभार थांबवा:-किरण डावकर

***बीड प्रतिनिधी:**
सध्याच्या वातावरणामध्ये व्हायरल इन्फेक्शन सारखे डेंग्यू मलेरिया चिकनगुनिया यांसारख्या आजाराने थैमान घातले आहे. या अनुषंगाने दररोजच्या सरासरी मध्ये पेशंटची संख्या वाढतच आहे. परंतु आष्टी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांच पेशंट कडे दुर्लक्ष केलं जात आहे याचबरोबर पेशंटला ट्रीटमेंट देण्याऐवजी बाहेरून मेडिकल आणण्याची मागणी केली जात आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये असंतोष बघायला मिळत आहे. सध्याची परिस्थिती म्हणजे सलाईन सुई आणि त्यासाठी लागणारी चिकटपट्टी सुद्धा बाहेरून घेऊन या इथपर्यंत साधी गोष्ट बाहेरून आणावे लागते. जो पेशंट किंवा त्याचे नातेवाईक बोलून आवाज उठवतात त्यालाच योग्य ती ट्रीटमेंट मिळाली जाते सिव्हील हॉस्पिटल मध्ये स्टाफ कर्मचार्यांकडून पेशंटला व्यवस्थित वागणूक देल्या जात नाही. माझ्यासारखे एक तरुण शरद हनुमंत खांडवे राहणार कर्हेवडगाव तालुका आष्टी जिल्हा बीड येथे आजारी असून हे स्वतः आजारी असल्यामुळे गेले दहा दिवस झालं सिव्हील हॉस्पिटल आष्टी येथे उपचारासाठी जाऊन येऊन उपचार घेत आहेत त्यामुळे त्यांच्याबरोबर अनेक नागरिकांना बाहेरून मेडिसिन आणण्याची मागणी होत आहे असे दिसून आले. जर एखादा पेशंट किंवा नातेवाईक याच्याबद्दल कर्मचाऱ्याकडे तक्रार केली तर तुम्ही कोणाला सांगायच तर सांगा किंवा कोणाला



कॉल करायचा ते करा अशी आरे रावीची भाषा इथले कर्मचारी करत आहेत. त्यामुळे डिलिव्हरीची पेशंट हे नगरला रेफर केलं जात आहे जर कोणाला आष्टी सिव्हील येथेच डिलिव्हरी करायची असेल तर त्यांनाही बाहेरून मेडिकल आणण्याची मागणी केली जात आहे. याचबरोबर पैशाची मागणी केली जाते आणि आम्ही पेशंटला जबाबदार नाही असे सांगण्यात येते त्यामुळे त्यांचे नातेवाईक त्या पेशंटला नगर येथे घेऊन जात आहेत. तसेच येथील सिव्हिल हॉस्पिटल मधल्या डॉक्टरांचे आष्टी मध्ये स्वतःचे प्रायव्हेट हॉस्पिटल असल्यामुळे ते फक्त इमर्जन्सी असेल तरच सिव्हील हॉस्पिटल ला येतात अन्यथा दुसऱ्याला बघायला सांगतात हे कुठेतरी थांबून सर्व सर्वसाधारण लोकांची गैरसोय होणं थांबले पाहिजे जर आपल्याला काही पुरावे हवे असतील तर ते ही मी देऊ शकतो असं मत सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर यांनी व्यक्त केलं आहे.

# सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात बांधिलकी बाधणार युवा नेतृत्व अमर वाघमोडे

**बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी**
बीड तालुक्यातील बहादरपूर येथील अमर पोपट वाघमोडे याचं पहिली ते चौथी पर्यंत प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळे मध्ये झालं. पाचवी ते दहावी अंबाजोगाई शहरात झालं नंतर महाविद्यालय शिक्षण माजलगाव या ठिकाणी व वैद्यकीय शिक्षण (डी फार्मसी )पाटोदा या ठिकाणी झाल, नंतर ते बीड शहरात आले, बीडमध्ये आल्यानंतर त्यांनी मेडिकल क्षेत्रात येण्याचा ठरवलं ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या ॲडमिशन संदर्भात बीड शहरात शिकायला आलेले विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींना सामोरे त्यांचे प्रश्न त्यांनी सोडवले बीड शहरातील डॉक्टर सोबत ओळख असल्याने, ग्रामीण भागातील रुग्णांच्या शहरातील सर्व हॉस्पिटल मध्ये पेशंटला ॲडमिट पासून सर्व येणाऱ्या अडचणी सोडवण्याचं काम सतत करत आहे,रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अनेकांना ब्लड कार्ड , सामाजिक कार्याच्या माध्यमातून देण्यात गेले आहेत.माहिती झाल्यावर किंवा कॉल केल्यावर तिथे भेट देतात.त्यांच्या अडीअडचणींना सातत्याने सामोरे जाण्याचे काम त्यांनी केलं आहे त्याचबरोबर सर्व जाती धर्माला सोबत



घेऊन, मराठा समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा सुद्धा त्यांनी दिलेला आहे, सर्व समाजाच्या जाती धर्मांना सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्यामध्ये एक आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे, महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या अत्यंत विश्वासू जवळचे आहेत, साहेबांच्या माध्यमातून अनेक कामे त्यांनी मार्गी लावले आहेत ,गोपीचंद पडळकर साहेब यांच्या अत्यंत जवळचे मानले जाणारे बीड जिल्ह्यामध्ये त्यांची ओळख आहे वैद्यकीय क्षेत्रामध्ये सातत्याने ते अग्रेसर असतात, सामाजिक कार्यामध्ये पण त्यांचा सक्रिय सहभाग असतो. धनगर समाजाला एसटी आरक्षण या प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात यावे यासाठी त्यांनी अनेक वेळा जिल्हाधिकारी यांना त्यांच्या शिष्टमंडळ मित्रपरिवारासोबत अनेकदा पाठपुरावा करून समाजाच्या प्रश्नासाठी ते खूप वेळ प्रश्न मांडण्यासाठी त्या ठिकाणी गेलेले आहेत , सामाजिक कार्यातून वैद्यकीय क्षेत्रातून त्यांची बीड जिल्ह्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात ओळख आहे, बीड गेवराई याबरोबर त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात युवकांची फळी निर्माण केली आहे,

# मनोज जरांगे पाटलांच्या वाढदिवसांनिमीत्त जय्यत तयारी जिल्हाभर विविध उपक्रम, अखंड मराठा समाजाकडून नियोजन

**बीड/प्रतिनिधी**
बीड: मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी आपण प्राण पणाला लावत असून आज त्यांचा वाढदिवस असल्याने मराठा समाजात मोठा आंनदोत्सव साजरा करण्यात येणार आहे. पाटील यांच्या वाढदिवसांची मागील आठ दिवसांपासून तयारी सुरू असून विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे,यासाठी मागील आकरा महिन्यांपासून मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील आंदोलन करत आहेत. समाजाच्या हितासाठी त्यांनी मोठे योगदान दिलेले असून त्यांच्याच मुळे लाखो मराठा बांधवांना कुणबीचे प्रमाणपत्र मिळाले असून आज याच प्रमाणपत्रावर अनेकजण सरकारी नोकरीलाही लागले आहेत. यामुळे अखंड मराठा समाजाकडून जिल्हाभर त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे.बीडमध्ये अखंड




मराठा समाजाच्या वतीने अनाथ आश्रम, निराधार भवन व आश्रम शाळा येथे अन्नधान्य व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्या येणार आहे. बीड जिल्ह्यातील गोशाळांना चारा वाटप करण्यात येणार आहे. बीड शहरातील सर्व महापुरूषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहेत. तर मनोज जरांगे पाटील यांना उदंड आयुष्य मिळावे, यासाठी सोमेश्वर मंदिर येथे महारूद्र अभिषेक करण्यात येणार आहे. शिवाय माने कॉम्पलेक्स येथे महा रक्तदान शिबीर आयोजीत केले आहे. याच बरोबर बीड जिल्ह्यातील माजलगाव, गेवराई, बीड, वडवणी, केज, धारूर, आष्टी, पाटोदा, शिरूर, अंबाजोगाई यासह ग्रामीण भागातील विविध गावात रक्तदान शिबीरे घेण्यात येत आहेत. रक्तदान केल्यानंतर प्रत्येकाला वृक्ष भेट दिले जाणार आहे. जिल्ह्यातील विविध गावात वृक्षारोपणाचे कार्यक्रमही घेण्यात येत आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी स्वतचा जिव धोक्यात घालणारे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त जिल्हाभर रक्तदान शिबीरे घेण्यात येत आहेत. यानिमीत्ताने जास्तीत जास्त मराठा बांधवांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात सहभागी व्हावे. याच बरोबर समाज बांधवांनी आपल्या भागात वृक्षारोपण करावे.

-हनुमान मुळीक, मराठा सेवक, बीड.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

गुरुवार १ ऑगस्ट २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# निद्रिस्त मराठ्यांना जागृत करणारे मराठ्यांचे क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील

मराठा मरहट्टा सत्यासाठी, न्यायासाठी, हक्कासाठी प्राण पणाला लावील पण मागे हटणार नाही. निजामशाही, मोगलशाही, आदिलशाही, कुतुबशाही, इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, जंजिऱ्याचा सिद्धी यांना तलवारीच्या टोकावर नाचवणारा मराठा आणि दुसरीकडे कुणबीकी करताना शेतात राबराब राबून, काबाडकष्ट करून अठरापगड जाती धर्माच्या लोकांचं भरणपोषण करणारा मराठा. पण काळाच्या ओघात परिस्थिती बदलत गेली. अस्मानी आणि सुलतानीच्या संकटाच्या फेऱ्यात मराठा अडकत गेला. लहरी मान्सून, पावसाची कधी येईल, कुठे येईल, किती येईल आणि कसा येईल याची खात्री नाही. कधी येऊन संकट तर कधी न येऊन संकट. पेरा वेळेवर होण्याची खात्री नाही, झाला तर उगवण्याची खात्री नाही, उगवलं तर विघ्न वाऱ्यातून वाचेल याची खात्री नाही आणि या सगळ्यातून वाचलं तर योग्य भाव लागेलच याची खात्री नाही. कष्ट याच एकमेव भांडवलावर स्वतःच्याच नव्हे तर जगाच्या भरण पोषणासाठी राबराब राबणारा कुणबी कायम वंचित आणि उपेक्षितच राहिला. कधी तो हेटाळणीचा विषय झाला, कधी विनोदाचा, कधी तुच्छ लेखला गेला, तर कधी कोरड्या सहानुभूतीचा, तर कधी कोरड्या सरकारी घोषणांचा विषय झाला. हाती मात्र कधीच आणि काहीच लागले नाही. कालांतराने जमिनी कमी होत गेल्या, शिक्षण महाग होत गेल्याने मिळवणं अवघड झालं आणि नोकरीच्या संधी नाही त्यामुळे प्रामाणिक, सत्यनिष्ठ, सरळमार्गी, पुण्यशील, सहनशील, खडतर जीवन जगणारा पण शेतकरी धर्माचं निष्ठेने पालन करणारा कुणबी समाज राष्ट्रहित व समाज हिताला स्वतःच्या व कुटुंबाच्या हितापेक्षा जास्त महत्त्व देणारा समाज समस्यांच्या गर्तेत सापडला आणि यातूनच लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या लेकरांनी आत्महत्या केल्या. ज्या देशात भिकारी सुद्धा आत्महत्या करत नाही त्या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात आणि तो देश स्वतःला कृषीप्रधान देश म्हणून घेतो ही बाब खऱ्या अर्थाने लाजिरवाणी आहे.

याच विवंचनेतून चाळीस वर्षांपूर्वी आरक्षणाची ठिणगी पेटली आणि सुरू झाली लढाई घटनात्मक हक्काची. स्वर्गीय अण्णासाहेब पाटील, स्वर्गीय अण्णासाहेब जावळे पाटील, स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब असे अनेक मोहरे या लढाईत कामी आले. अनेकांनी बलिदाने दिली. मोर्चे, आंदोलने, उपोषणे, धरणे, रास्ता रोको, मेळावे, सभा हे सत्र सतत अविरतपणे सुरूच राहिलं. २०१६ मध्ये ५८ क्रांती मोर्चे शांततेत संपन्न झाले. लाखो मराठे रस्त्यावर उतरले. ढोंगी, कपटी, लबाड राजकारण्यांनी वेळोवेळी समाजाच्या काही मॅनेज पुढाऱ्यांना हाताशी धरून वेळ मारून नेली. पण त्यात समाजाच्या तोंडाला पाने पुसली गेली. चाळीस वर्षात सगळ्याच पक्षांची सरकारे आली पण सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी मराठा समाजाची घोर फसवणूक आणि निराशाच केली. आता सगळ्या आशा मावळल्या असं वाटत असतानाच एका नव्या आंदोलनाची सुरुवात झाली आणि पुन्हा एक आशेचा किरण दिसला. तोच आशेचा किरण पुढे मराठ्यांचा क्रांतिसूर्य झाला आणि वर्षानुवर्ष निद्रिस्त असलेला मराठा समाज सर्वार्थाने खडबडून जागा झाला. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात आपल्या न्याय हक्कांपासून वंचित, उपेक्षित राहिलेल्या अन्याय, अत्याचार, शोषण व पिळवणुकीने गलितगात्र झालेल्या मराठा समाजाच्या मनात जी खदखद होती, जो असंतोष होता त्याला मोकळी वाट करून देणारे नेतृत्व संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटलांच्या माध्यमातून समाजाला मिळाले. त्यांनी विस्तवासारख्या तेजस्वी असलेल्या मराठ्यांच्या अस्मितेवर, मनावर जमा झालेली निराशेची काजळी झटकून टाकत त्याच मनात स्वाभिमान व अशेची पेरणी केली, विश्वासाची पेरणी केली.

फाटकी माणसं इतिहास घडवतात असा जगाचा इतिहास आहे आणि पुन्हा अगदी तसाच इतिहास महाराष्ट्रात घडला. समाजाच्या कल्याणाचा विचार बंगल्यात नव्हे तर झोपडीतच जन्माला येतो हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. ना राजबिंडा व्यक्तिमत्व, ना बंगला, ना गाडी, ना वातानुकूलित ऑफिस, घरची परिस्थिती म्हणाल तर अत्यंत बेताची, पत्र्याचं साधं घर, दोन एकर जमीन तीही कोरडवाहू, पण या वाघाची डरकाळी मुंबई दिल्लीतच काय तर अख्ख्या जगात पोहोचली कारण हा आवाज इमानदारीचा आणि निष्ठेचा आहे.

**त्यागातून विश्वास** मरण पत्करेन पण मॅनेज होणार नाही, एक तर मराठ्यांच्या आरक्षणाची विजयीयात्रा निघेल किंवा माझी अंत्ययात्रा निघेल, आलो तर तुमचा गेलो तर समाजाचा कुंकू पुसून तयार राहा अशा निर्वाणीच्या शब्दात पत्नीचा निरोप घेऊन घराबाहेर पडलेला योद्धा आई-वडील, मुलाबाळांचा विचार न करता समाजालाच मायबाप मानून समाजासाठी प्राण तळहातावर घेऊन लढायला सिद्ध झाला. समाजाप्रतीचा प्रामाणिकपणा, आढळनिष्ठा, समाजाला न्याय मिळवून देण्याची जिद्द, चिकाटी, प्रयत्नांमधलं सातत्य, प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी, प्रचंड इच्छाशक्ती, दुर्दम्य आत्मविश्वास, मराठ्यांना आरक्षण मिळवून दिल्याशिवाय एक पाऊलही मागे हटणार नाही हा ठाम निर्धार आणि प्रसंगी आपला प्राणही पणाला लावण्याची तयारी या सर्व गुणांनी मनोज जरांगे पाटील गुणसंपन्नतेच्या सर्व कसोट्यांवर खरे उतरले. लोकमान्य झाले, लोकप्रिय झाले. कोट्यावधी मराठ्यांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाले. या नेतृत्वाने कोट्यावधी लोकांना लोहचुंबकाप्रमाणे स्वतःकडे आकर्षित केले. अलीकडच्या काळात समाजातील महिला पुरुष अबालवृद्धांचं एवढं प्रेम, एवढा विश्वास मिळवणारं एकमेव नेतृत्व म्हणजे मनोज जरांगे पाटील. क्षणात कोट्यावधी लोकांच्या डोळ्यात अश्रू आणि क्षणात कोट्यावधी लोकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारं नेतृत्व अशी किमया साधणारे किमयागार म्हणजे मनोज जरांगे पाटील.

**समाजानेही सर्वकाही दिले**

माझा समाज मला प्रिय आहे. माझी जात मला प्रिय आहे. आमच्या लेकरांना आरक्षण लागतयं तेवढं द्या मला बाकी काही नको म्हणत मैदानात उतरलेल्या जरांगे पाटलांच्या पाठीशी समाज ताकदीने उभा राहिला. ऊन, वारा, पाऊस, थंडी दिवस, रात्र, कशाचीही तमा न बाळगता चांद्यापासून बांद्यापर्यंतचा अवघा मराठा समाज एका सर्वसामान्य शेतकरी पुत्राच्या नेतृत्वाखाली एक झाला. एक नवा इतिहास घडला. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, सगळा सगळा मराठा एक झाला. वेळ, पैसा, सेवा, सोयी, सुविधा, अन्न, पाणी, निवारा, वाहने, प्रचार - प्रसार, अगदी ज्याच्याकडे जे आहे ते आणि ज्याला जे शक्य होईल ते मराठा सेवक म्हणून समाजातील प्रत्येकाने तन मन धनाने योगदान दिले. मनोज जरांगे पाटलांच्या नेतृत्वाखाली समाजाने समाजासाठी उभं केलेलं समाजाचं आंदोलन अशी जगात ख्याती झाली.

**मार्ग शांततेचा**

शांततेत सर्वात जास्त ताकद असते. शांतता हे जगातील सर्वात प्रभावी शस्त्र आहे हे या आंदोलनाने दाखवून दिले. जगाचे लक्ष वेधून घेणारी चळवळ उभी राहिली. जगातील सर्व वंचितांसाठी प्रेरणादायी चळवळ व नेतृत्व अशी जगभरात ओळख या आंदोलनाच्या माध्यमातून निर्माण झाली. महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह, उपोषण या मार्गांचा अवलंब करत महात्मा गांधींचा मार्ग हाच लोकशाहीत न्याय हक्कासाठी लढण्याचा एकमेव राजमार्ग आहे हे या आंदोलनाने सिद्ध केले. उपोषण, साखळी उपोषण, धरणे आंदोलन, रास्ता रोको, भव्य शांतता रॅली, विराट शांतता सभा अशा निरूपद्रवी पण प्रभावशाली शस्त्राने हि चळवळ नैतिकदृष्ट्या उंचावर पोहोचली. शिस्त, शांतता, संयम, सामंजस्य, परस्पर सहकार्य हे गुण अंगी असलेल्या मराठा समाजाने २०१६ च्या मराठा क्रांती मोर्चांपासून आजतागायत ही मूल्य निष्ठेने व प्राणपणाने जपली. **विक्रमी सभा** २०२३ च्या १४ ऑक्टोबरला आंतरवाली सराटी येथे झालेली सभा ही जागतिक पातळीवर विक्रमी सभा ठरली. आंतरवाली सराटी आणि परिसरातील १२३ गावांनी सुरू केलेले आंदोलन जगभरात पोहोचले. एका शेतकऱ्याच्या पोराने शेतात घेतलेली सभा देशातीलच नव्हे तर जगभरातील गाजलेल्या मैदानांना आणि नेत्यांना लाजवणारी ठरली. उद्या सभा पण आजच मैदान गच्च भरले. अर्धे लोक तर मैदानापर्यंत पोहोचलेच नाही. आणि आजूबाजूला वीस किलोमीटरच्या परिसरात सगळीकडे माणसं आणि वाहनांची गर्दीच गर्दी होती. शेतातील पिकांना शेतकरी पोटच्या लेकरांपेक्षा जास्त जपतात पण आरक्षणाअभावी आपल्या लेकरांचे भविष्य धोक्यात आहे हे लक्षात आलेल्या शेतकऱ्यांनी सभेला जागा करण्यासाठी उभ्या पिकात नांगर फिरवला. राज्यभरातून आणि देशभरातून जवळजवळ दीड कोटी मराठा येथे एकत्र झाला. एक मराठा लाख मराठा ही घोषणा एक मराठा कोटी मराठा पर्यंत पोहचली. आकाशात चांदण्या आणि जमिनीवर मराठे मोजणं केवळ आणि केवळ अशक्यच हे सिद्ध झाले.



मनोज जरांगे पाटलांची किमया स्टेजवर कुठलाही मोठा प्रस्थापित राजकीय नेता नसताना एकट्याच्या बळावर कोट्यावधी मराठा एक केला आणि जगातील सर्वात मोठी सभा यशस्वी केली. ३०० एकरचा परिसर गर्दीने फुलवणारं एकमेव अराजकीय नेतृत्व अशी जगाच्या इतिहासात नोंद झाली. ५८ मोर्चे काढणाऱ्या मराठा समाजाने नेता म्हणून कोणावरही विश्वास दाखवला नव्हता पण एका सर्वसामान्य गरीब कुटुंबातील शेतकरी पुत्राला समाजाने नेता म्हणून स्वीकारलं व मागे ताकद उभी केली. एका दिवसात एकापाठोपाठ एक अशा ३० सभा घेणारे नेतृत्व. जगात एका दिवसात सर्वाधिक लोकांना संबोधित करणारा नेता. प्रवासात सर्वाधिक लोकांना भेटणारा नेता. सर्वाधिक लोकांचा विश्वास, प्रेम मिळवणारा नेता. युट्युबला सर्वाधिक लोकांनी लाईव्ह पाहिलेला नेता मनोज जरांगे पाटील व सभा आंतरवली सराटी. साधा ग्रामपंचायत सदस्य ही नसताना पोलिसांचा ताफा मागेपुढे घेऊन फिरणारा नेता. आकर्षक व्यक्तिमत्व, शिक्षण, पद, प्रतिष्ठा, पैसा, संपत्ती काहीही नसताना कोट्यावधी लोकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेला नेता. स्वतःची साधी दुचाकी नसताना मागेपुढे शेकडो हजारो गाड्यांचा ताफा घेऊन फिरणारा नेता. आपल्या हाकेवर करोडो लोक एकत्र येतात तरीही गर्व अहंकार नाही की डोक्यात हवा नाही असा नेता. लोकशाहीतील उपोषणाचे प्रभावी अस्त्र हाती घेऊन शांततेच्या मार्गाने जगातील सर्वात मोठे आंदोलन करणारा नेता. पद, पैसा, संपत्तीची ऑफर नाकारून समाजाप्रती एकनिष्ठ व प्रामाणिक राहणारा एकमेव नेता. सायंकाळी सहा वाजताची सभा पहाटे चार वाजता झाली तरी कडाक्याच्या थंडीत दहा तास रस्त्यावरील एकही श्रोता जागेवरून हलला नाही असा एकमेव नेता व एकमेव वक्ता. आंदोलन काळात घराचा उंबरा ही न शिवणारा नेता. आधी कुटुंब मग समाज अशी रीत प्रचलित असताना आधी समाज मग कुटुंब असे सांगणारा आणि तसे वागणारा एकमेव नेता. भारतातच नव्हे तर जगभरात कौन है जरांगे ? असा सर्वाधिक लोकांच्या मनात प्रश्न निर्माण करणारा एकमेव नेता.सरकार निष्प्रभ जरांगे पाटलांच्या विरोधात बरच काही करण्याची इच्छा असूनही राज्यकर्ते काहीच करू शकले नाही. कारण भ्रष्टाचाराचा आरोप करता येत नाही, का ? तर साधे ग्रामपंचायतचे सदस्य नाही व कधीच कुठलं सत्तेचं पद नाही. साधं घर तेही पत्र्याचं आणि दोन एकर कोरडवाहू जमिनीचा मालक त्यामुळे धनदांडगा म्हणून हिनवताही येत नाही. अडाणी, अशिक्षित म्हणावं तर राजकारण्यांची, अभ्यासकांची बुद्धिवंतांची, कायदेतज्ज्ञांची बोलती बंद करणारा, मती गुंग करणारा नेता. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स याचीही मात्रा चालत नाही कारण पैशाचा, संपत्तीचा मोह नाही, सत्तेचे वेड नाही आणि प्रसिद्धीची हाव नाही. त्यामुळे सर्वपक्षीय प्रस्थापित राजकारण्यांचा सगळा केमिकल लोच्या झाला आहे. काय करावा आणि काय करू नये हेच कळायला तयार नाही अशी अवस्था प्रस्थापित पुढाऱ्यांची झाली आहे.

**मराठयांची व्होट बँक**

राजकिय पक्ष आणि नेत्यांच्या उरात धडकी भरवणारा आणखी एक क्रांतिकारक बदल घडून आला. स्वातंत्र्यानंतरच्या इतिहासात प्रथमच मराठा समाजाची व्होट बँक तयार होत असल्याचे दिसून आले. ती केवळ आणि केवळ जरांगे पाटलांमुळेच. आज पर्यंत जे कोणाला जमलं नव्हतं ते जरांगे पाटलांनी करून दाखवलं. आतापर्यंत मराठा समाजाची एकी आणि ताकद रस्त्यावरच्या मोर्चात दिसत होती. मैदानातल्या सभेत दिसत होती पण मतपेटीत दिसत नव्हती आणि लोकशाहीमध्ये मतपेटीतली ताकद महत्त्वाची असते. मराठा समाज धर्मासाठी मतदान करत होता. नेत्यासाठी मतदान करत होता. पक्षासाठी मतदान करत होता. पण जातीसाठी म्हणून आजपर्यंत मतदान करत नव्हता. जरांगे पाटलांनी मराठा समाजाला जातीसाठी मतदान करण्याचे महत्त्व पटवून दिले आणि मराठा समाजाची व्होट बँक तयार केली. मराठा समाजासाठी जरांगे पाटलांचा शब्द हा प्रमाण आहे, अंतिम आहे याचा प्रत्यय २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आला. मराठा समाजाने प्रथमच जातीसाठी मतदान करून अनेक आश्चर्यकारक निकाल लावले.

मराठा आणि कुणबी एकच

मराठा आणि कुणबी एकच आहे हे वारंवार सिद्ध झाले आहे. पण सरकार आणि सर्वपक्षिय राजकारणी आपल्या राजकीय स्वार्थापोटी हे मान्य करायला अद्यापही तयार नाहीत. गायकवाड आयोगाने मराठा समाजाला आरक्षणाची गरज आहे, मराठा आणि कुणबी एकच आहे हे स्पष्ट केलेले आहे. मराठा आणि कुणबी दोन्ही समाजात रोटी बेटी व्यवहार होतात हे सिद्ध झालेले आहे. १९६७ पूर्वीच्या लाखो मराठ्यांच्या कुणबी नोंदी आत्ताच्या शिंदे समितीच्या सर्वेक्षणात सापडलेल्या आहेत. त्या नोंदींच्या आधारे लाखो मराठे कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे ओबीसी आरक्षणात गेले आहेत. त्यामुळे सरकारने आणि राजकीय पक्षांनी व नेत्यांनी कितीही कोंबडं झाकून ठेवलं म्हणून सूर्य उगवायचा थांबणार नाही. आता मराठा आणि कुणबी एकच की वेगळे यावर चर्चा करणे म्हणजे हाताच्या काकणाला आरशात पाहण्यासारखे आहे. सरकार व तथाकथित पक्ष, नेते, अभ्यासक, कायदेतज्ञ व स्वतःला बुद्धीवादी म्हणवणाऱ्यांची कीव करावी तेवढी कमीच आहे.

सामाजिक सलोखा जपणारं नेतृत्व

मराठा समाज कधीच जातिवाद करत नाही. चारशे वर्षांपासूनचा इतिहास साक्षीला आहे. मराठा समाजाने कायम सगळ्यांना सन्मानाने सोबत घेतलेलं आहे. घासातला घास दिलेला आहे पण काही राजकीय शक्ती २०१६ च्या क्रांती मोर्चांपासून मराठा समाज आपल्या न्याय हक्कांसाठी रस्त्यावर उतरला की धार्मिक व जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक संघर्ष उभा करून आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करतात. पण मनोज जरांगे पाटलांनी वारंवार स्पष्ट केले आहे की मराठा समाजाचे आंदोलन कोणत्याही जातीच्या व धर्माच्या विरोधात नसून आपल्या घटनात्मक न्याय्य हक्कांसाठी ते सरकारच्या व सर्वपक्षीय प्रस्थापित पुढाऱ्यांच्या विरोधात आहे. कधी सत्ताधारी तर कधी विरोधातील नेते जाणीवपूर्वक अंगावर येतात तेंव्हा त्यांना जरांगे पाटलांच्या खास शैलीत सडेतोड उत्तर दिले जाते पण सर्वसामान्य समाजाच्या विरोधात कधीच भूमिका घेतली जात नाही आणि म्हणूनच दलित, मुस्लिम ओबीसी अशा सर्व समाज बांधवांनी मनोज जरांगे पाटलांचे ठिकठिकाणी भव्य स्वागत केले आणि समर्थन दिले. सर्वसामान्य ओबीसी मराठा मुस्लिम दलित यांच्यातला एकोपा सलोखा कायम राहावा अशीच भूमिका प्रत्येक वेळी घेतली गेली आहे. सरकार, राजकीय पक्ष व नेत्यांनी असाच समंजसपणा दाखवला तर महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा कायम राहील हे मात्र निश्चित.

आता नाही तर कधीच नाही

काळ संकटाचा आहे पण वारसाही संघर्षाचा आहे. जरांगे पाटलांनी मराठा समाजाच्या लक्षात आणून दिले की तुम्ही एक नाही झालात आणि संघर्ष नाही केला तर तुम्ही संपणार आहात. पुढचा काळ आणि प्रवास कठीण आहे. त्यामुळे जरांगे पाटलांनी उभा केलेले आंदोलन मराठा समाजाने नुसतं डोक्यावरच घेतलं नाही तर डोक्यातही घेतलं आहे. महाराष्ट्रातील, देशभरातील आणि जगभरातील सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी शेतमजुरांपासून ते व्यापारी, उद्योजक, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, पत्रकार, राजकीय, सामाजिक नेते, कार्यकर्ते, कायदेतज्ञ, घटनातज्ञ अशा सर्वच क्षेत्रातील सर्वांनी हे आंदोलन, आंदोलनाचा मार्ग, उद्दिष्टे, मागण्या व आंदोलनाचे नेतृत्व मान्य केले आहे. आर्धी लढाई जिंकली आहे आर्धी बाकी आहे. ती जिंकायचीच आहे त्यासाठी मराठा लढणार, झुंजणार आणि जिंकणार हा विश्वास नेतृत्वाच्या आणि समाजाच्या मनात आहे. एक एक मराठा गड किल्ला भासेल, सह्याद्री पुन्हा एकदा खदखदून हसेल, कडे कपाऱ्या जागतील नेत्री घालुनी तेल, गनिमी काव्याचा हिसका मग सरकारला उमगेल.

**ह. भ. प. संतोष महाराज डोंगरे**
**जिल्हाध्यक्ष**
**संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com